शनिवार दि.१५ फेब्रुवारी २०२५

हे शब्द आज माझे झाले मुके तरीही !
ते बोलतील भाषा हमखास वादळाची !!
–ॲड.डॉ विजयकुमार कस्तुरे चिखलीकर

जनसामान्य माणसाचे हक्काचे व्यासपीठ

# दैनिक लोकनेता बीड

मुख्यसंपादक : ज्ञानेश्वर बुधवत संपादक : ज्ञानेश्वर मुंढे

सुवर्णसंधी...! दैनिक लोकनेता सुवर्णसंधी...!
पत्रकार होण्यासाठी सुवर्ण संधी
दैनिक लोकनेता (जनसामान्य माणसाचे हक्काचे व्यासपीठ)
अल्पावधीतच वाचकांच्या लेखकांच्या पसंतीत उतरलेल्या दैनिक लोकनेता साठी संपूर्ण महाराष्ट्रात जिल्हा, तालुका शहर व गाव पातळीवर प्रतिनिधी नेमणे आहे.अनुभवी व विनाअनुभवी इच्छुकांनी त्वरित संपर्क साधावा !
संपर्क :- संपादक ८४५९९७७९०४

RNI-MAHMAR/2023/89402 Email : elokneta@gmail.com वर्ष : ०२ अंक :१५० किंमत २ रुपये Lokneta News - लोकनेता न्युज 8459977904 epaper.lokneta.in

# धनंजय मुंडे यांना पक्षीय पातळीवर मोठा दिलासा:आरोप सिद्ध होईपर्यंत कारवाई नाही

## राष्ट्रवादीच्या बैठकीत अजित पवार यांनी पुन्हा दिले अभय

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**मुंबई (वृत्तसंस्था)**

राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष तथा उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी बीडचे सरपंच संतोष देशमुख हत्या प्रकरणात अडचणीत सापडलेले राज्याचे अन्न व नागरी पुरवठा मंत्री धनंजय मुंडे यांची पुन्हा एकदा अभय दिले आहे. धनंजय मुंडे यांच्यावरील आरोप सिद्ध होत नाहीत तोपर्यंत त्यांच्यावर कोमतीही कारवाई करणार नाही, असा पुनरुच्चार त्यांनी राष्ट्रवादीच्या एका अनौपचारिक बैठकीत केला आहे. त्यामुळे धनंजय मुंडे यांना पक्षीय पातळीवर मोठा दिलासा मिळाला आहे.गत अनेक दिवसांपासून धनंजय मुंडे यांच्यावर संतोष देशमुख हत्या प्रकरण, वाल्मीक कराडशी असणारे आर्थिक संबंध, कृषी घोटाळा आदी मुद्यांवर गंभीर आरोप होत आहेत. यामुळे त्यांच्यावरील राजीनाम्याचा दबाव वाढला आहे. त्यातच करुणा मुंडे यांच्या प्रकरणात कोर्टाने ओढलेले ताशेरे यामुळेही राष्ट्रवादी काँग्रेसची पुरती नाचक्की होत आहे. या पार्श्वभूमीवर अजित पवार यांच्या देवगिरी बंगल्यावर गुरुवारी रात्री राष्ट्रवादी काँग्रेसच्या बड्या नेत्यांची अनौपचारिक बैठक झाली.

या बैठकीत अजित पवारांनी धनंजय मुंडे यांच्यावरील आरोपांप्रकरणी आपली भूमिका पुन्हा एकवार स्पष्ट केली. धनंजय मुंडेंवरील आरोप सिद्ध होत नाहीत, तोपर्यंत त्यांच्यावर कोणतीही कारवाई होणार नाही, असे ते म्हणाले. सूत्रांच्या माहितीनुसार, तब्बल दोन तास चाललेल्या या बैठकीला धनंजय मुंडे यांच्यासह प्रफुल्ल पटेल, सुनील तटकरे आदी पक्षाचे ज्येष्ठ नेते उपस्थित होते. कृषी घोटाळ्याचा अहवाल येईपर्यंत धनंजय मुंडे यांच्यावर कोणतीही कारवाई करू नये, अशी भूमिकाही यावेळी राष्ट्रवादीच्या नेत्यांनी यावेळी घेतल्याचे समजते. पक्षाच्या या भूमिकेमुळे धनंजय मुंडे यांना पक्षीय पातळीवर मोठा दिलासा मिळाल्याची चर्चा आहे.

उल्लेखनीय बाब म्हणजे धनंजय मुंडे यांच्यावरील आरोप अत्यंत गंभीर आहेत. यामुळे त्यांचे राजकीय भवितव्य संकटात सापडले आहे. विरोधक या मुद्यावरून सातत्याने राष्ट्रवादीची चौफेर कोंडी करण्याचा प्रयत्न करत आहेत. विश्लेषकांच्या मते, धनंजय मुंडेंवर एखादी कारवाई केल्यास त्याचा राष्ट्रवादीच्या प्रतिमेवर मोठा परिणाम होईल. या प्रकरणी गटबाजी उफाळून येण्याचीही भीती आहे. त्यामुळे अजित पवार सध्या यासंबंधी अत्यंत सावध भूमिका घेत आहेत.दुसरीकडे, मंत्री धनंजय मुंडे सध्या बीडच्या मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख हत्याकांडामुळे अडचणीत सापडलेत. संतोष देशमुख यांची गत ९ डिसेंबर रोजी निर्घृण हत्या झाली होती. या प्रकरणाशी संबंधित खंडणी प्रकरणात धनंजय मुंडे यांचे निकटवर्तीय वाल्मीक कराडला अटक झाली आहे. त्याच्यावर मकोका अंतर्गतही कारवाई झाली आहे. त्यामुळे विरोधकांनी मुंडे यांच्या राजीनाम्याची मागणी लावून धरली आहे. पण मुंडे यांनी ही मागणी धुडकावून लावत या प्रकरणी अजित पवार व मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हेच योग्य तो निर्णय घेतील असे ठणकावून सांगितले आहे. या पार्श्वभूमीवर अजित पवारांनी त्यांना तूर्त अभय दिले आहे.



# महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या परीक्षेत शिराढोणचा डंका

## निकिता मंगरुळे लिपिक तर संतोष स्वामी कर निरीक्षक पदी निवड

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**शिराढोण । दौलत पांडागळे**





२०२३ मध्ये घेण्यात आलेल्या महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या परीक्षेचा निकाल नुकताच जाहीर झाला असून या परीक्षेत कंधार तालुक्यातील शिराढोण येथील दोन भूमिपुत्रानी घवघवीत यश संपादन केले आहे. यामध्ये ग्रामपंचायत सदस्य सदानंद भुरे यांची भाची निकिता बळीराम मंगरुळे हिची लिपिक तर संतोष नागनाथ स्वामी याची कर निरीक्षक पदी निवड झाली आहे. प्रचंड मेहनत, जिद्द आणि सातत्य याबळावर त्यांनी हे यश संपादन केले असल्याचे त्यांनी दैनिक लोकनेताशी बोलताना सांगितले. या यशाबद्दल त्यांचे सर्व स्तरातून कौतुक होत आहे..

# राज्य स्तरीय धनुर्विद्या स्पर्धेत पद्मनाभ खरातला २ सुवर्णपदकांसह ३ सिल्वर प्राप्त

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**गेवराई । ज्ञानेश्वर उदावंत**



९ आणि १० जानेवारी २०२५ रोजी पुणे येथे येरवडा परिसरात महाराष्ट्र शासन क्रीडा व युवक सेवा संचालनालय पुणे अंतर्गत जिल्हा क्रीडा परिषद, जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय पुणे आणि फिल्ड आर्चरी असोसिएशन महाराष्ट्र यांच्या संयुक्त विद्यमानाने आयोजित राज्यस्तरीय शालेय फिल्ड आर्चरी स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते .

न्यू होरायझन शाळेतील विद्यार्थी इयत्ता ९ वी त शिकत असलेला पद्मनाभ गणेश खरातला ओव्हर ऑल गोल्ड मेडल व इतर प्रकारात एकूण ५ मेडल प्राप्त झाले. पद्मनाभने राज्यस्तरीय चॅम्पियनशिपमध्ये १७ वर्षीय मुलांच्या कंपाऊंड आर्चरीत वर्चस्व राखत ४५० पैकी ४४९ गुण मिळवले असून २ गोल्ड आणि ३ सिल्वर पदक जिंकले. पद्मनाभने हे प्राविण्य सातारा येथील राष्ट्रीय कोच प्रवीण सावंत यांच्या मार्गदर्शनाखाली मिळवले. गेवराई तालुका व बीड जिल्ह्याचा सुपूत्र पद्मनाभ गणेश खरात याचे सर्वत्र कौतुक होत आहे .

# दहिगावात कृषीकन्यांनी केले मका पिकावरील लष्करी अळीचे एकात्मिक कीड व्यवस्थापनाचे प्रात्यक्षिक

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**माळशिरस । बबनराव धायतोंडे**



मका पिकावरील लष्करी अळी अत्यंत विध्वंसक किड आहे,यामुळे पिकाचे नुकसान होतेच त्यासोबत लष्करी अळीचा प्रादुर्भाव कमी करण्यासाठी जी रासायनिक औषधे वापरली जातात त्याचा अंश मातीमध्ये व जनावरांच्या चाऱ्यामध्ये दिसून येत आहे.

लष्करी अळीचा प्रादुर्भाव बघता दहिगाव मध्ये डॉ.शरदचंद्र पवार कृषी महाविद्यालय बारामतीच्या विद्यार्थिनींनी, कु.शितल शिंदे,राजश्री सूर्यवंशी,दमयंती वनवे,मधुरा कोंडे,समृद्धी बोडके,संचिता डोंबाळे,मिनल माने,यांनी मका पीकावरील लष्करी अळीचे एकात्मिक कीड व्यवस्थापनाचे प्रात्यक्षिक केले.यावेळी राजश्री सूर्यवंशी यांनी लष्करी अळीचे जीवनचक्र, शेतकऱ्यांचे मित्र किटक यांची माहिती दिली.तसेच विद्यार्थिनींनी बर्ड पर्चेस,कामगंध सापळे,शेतामध्ये लावले,शेतकऱ्यांना बी.टी.ची माहिती दिली आणि शेतामध्ये फवारणी केली. इतर.रासायनिक औषधांचा कमी वापर करणे व इतर उपाययोजनांचा वापर करून किड नियंत्रण कसे करावे हे सांगितले. याप्रसंगी शेतकऱ्यांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दाखवला.या प्रात्यक्षिकासाठी प्रा.एस.के.दळवे सर यांनी मार्गदर्शन केले.

# डिजीटल मिडीया संपादक संघटनेच्या अहमदपूर तालूकाध्यक्ष पदी अजय भालेराव तर उपाध्यक्षपदी गणेश मुंडे यांची निवड

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**लातूर । विष्णू मोहन पोले**



येथील एसएस न्यूज चॅनल चे संपादक तथा पत्रकार अजय भालेराव यांची नूकतीच डिजीटल मिडीया संपादक पत्रकार संघटनेच्या अहमदपूर तालूकाध्यक्ष पदी तर गणेश मुंडे यांची उपाध्यक्षपदी नियुक्ती करण्यात आली आहे.राज्यातील जेष्ठ संपादक तथा संघटनेचे संस्थापक अध्यक्ष राजा माने यांच्या हस्ते नुकतेच त्याना नियुक्ती पत्र देण्यात आले.तसेच तालूका सचिव पदी पत्रकार भिमराव कांबळे यांची निवड करण्यात आली आहे.डिजीटल मिडीया संपादक पत्रकारांच्या अडी अडचणीवर मात करत संघटनेच्या धैय्य धोरणानुसार सर्वांना सोबत घेवून पूढील काळात काम करणार असल्याचे अजय भालेराव यांनी या वेळी सांगीतले.या निवडी बद्दल अजय भालेराव आणी गणेश मूंडे व भिमराव कांबळे त्यांचे सर्वत्र स्वागत होत आहे.

# उमरी स्व.बापूसाहेब देशमुख गोरठेकर क्रीडा महोत्सव संपन्न

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**उमरी । महेश पडोळे**

तालुक्याचे भाग्यविधाते, शिक्षण महर्षी, लोक नेते माजी आमदार स्वर्गीय कै. बापूसाहेब देशमुख गोरठेकर साहेबांच्या स्मृतीत ’स्व. बापूसाहेब देशमुख गोरठेकर क्रीडा महोत्सवाचे आयोजन करण्यात आले होते.

या क्रीडा महोत्सवाचे आयोजन नूतन विद्यालय सेवाभावी शिक्षण संस्था संचलित, कै. बाबासाहेब देशमुख गोरठेकर कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, उमरीच्या वतीने दि. ०७ ते ०९ फेब्रुवारी, २०२५ या कालावधीत करण्यात आले होते. क्रीडा महोत्सवाचे उद्घाटन नूतन विद्यालय सेवाभावी शिक्षण संस्थेचे सचिव मा. कैलासभाऊ देशमुख गोरठेकर साहेब यांच्या शुभ हस्ते पार पडले.

या महोत्सवात नूतन विद्यालय सेवाभावी शिक्षण संस्था आणि श्री लाल बहादूर शास्त्री शिक्षण संस्था अंतर्गत सर्व प्राथमिक, माध्यमिक, उच्च माध्यमिक व वरिष्ठ महाविद्यालयीन शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी क्रिकेट, व्हॉलीबॉल, बुद्धिबळ, कॅरम, रस्सीखेच इ. विविध क्रीडा स्पर्धेत आपला सक्रिय सहभाग नोंदविला. या तीन दिवस चाललेल्या क्रीडा महोत्सवाचा समारोप आणि बक्षिस वितरण समारंभ रविवारी पार पडला. या समारंभाच्या अध्यक्षस्थानी श्री लाल बहादूर शास्त्री शिक्षण संस्थेचे सचिव मा. शिरीषभाऊ देशमुख गोरठेकर साहेब होते. तसेच मंचावर मा. कैलासभाऊ देशमुख गोरठेकर, श्री. राजेश्वर वंगरवार, सर्व संचालक मंडळ, सर्व मुख्याध्यापक, श्री. रावसाहेब कुदळेकर, मा. दिग्विजय देशमुख, डॉ. माधव विभूते, माजी मुख्याध्यापक लामकानीकर सर, श्री फालाजी पाटील, प्राचार्य डॉ. पुरुषोत्तम गाटे, उप प्राचार्य डॉ. विलास गणिपूरकर इ. ची उपस्थिती होती. या महोत्सवाच्या आयोजनात कै. बाबासाहेब देशमुख गोरठेकर कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयाचे प्राचार्य, उप प्राचार्य, क्रीडा विभाग प्रमुख डॉ. बळीराम इंगळे आणि सर्व प्राध्यापक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी मोलाचे योगदान दिले.



# स्व.गोपीनाथ मुंडे शेतकरी अपघात सुरक्षा सानुग्रह अनुदान योजना

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**बुलढाणा । ज्ञानेश्वर बुधवत**

शेती व्यवसाय करताना होणारे अपघात, वीज पडणे, पूर, सर्पदंश, विंचू दंश, विजेचा शॉक आदी नैसर्गिक आपत्तीमुळे होणारे अपघात, रस्त्यावरील अपघात, वाहन अपघात, अन्य कोणत्याही कारणामुळे होणाऱ्या अपघातामुळे शेतकऱ्यांचा मृत्यू झाल्यास स्व. गोपीनाथ मुंडे शेतकरी अपघात सुरक्षा सानुग्रह अनुदान योजनेतून लाभ देण्यात येतो.

अपघातामुळे मृत्यू ओढावतो किंवा काहींना अपंगत्व येते. कर्त्या व्यक्तीस झालेल्या अपघातामुळे कुटुंबाच्या उत्पन्नाचे साधन बंद होऊन अडचणीची परिस्थिती निर्माण होते. अशा अपघातग्रस्त शेतकरी, त्यांच्या कुटुंबास आर्थिक लाभ देण्याकरिता राज्यातील सर्व वहितीधारक खातेदार शेतकरी आणि वहितीधारक खातेदार म्हणून नोंद नसलेले शेतकऱ्याच्या कुटुंबातील कोणत्याही एका सदस्यास आई–वडील, शेतकऱ्याची पती, पत्नी, मुलगा आणि अविवाहित मुलगी यापैकी कोणत्याही एका व्यक्ती १० ते ७५ वर्षे वयोगटातील एकूण दोन जणांकरीता गोपीनाथ मुंडे शेतकरी अपघात सुरक्षा सानुग्रह अनुदान योजना राबविण्यात येत आहे. सदर योजना १९ एप्रिल २०२३ पासून राबविण्यात येत आहे. गोपीनाथ मुंडे अपघात सुरक्षा सानुग्रह अनुदान योजनेंतगत सन २०२४–२५ या वर्षात जानेवारीपर्यंत १९६ प्रस्ताव मंजूर करण्यात आले आहे.

योजनेच्या प्रयोजनार्थ कुटुंबातील वहितीधारक खातेदार म्हणून नोंद नसलेले एक सदस्यांमध्ये आई–वडील, शेतकऱ्याची पती, पत्नी, मुलगा व अविवाहीत मुलगी यांचा समावेश ग्राह्य धरण्यात येणार आहे. कृषि गणनेनुसार निर्धारित केलेल्या वहितीधारक खातेदार शेतकरी आणि वहितीधारक खातेदार म्हणून नोंद नसलेले शेतकऱ्यांच्या कुटुंबातील कोणताही एक सदस्य असे एकूण दोन जणांकरीता गोपीनाथ मुंडे शेतकरी सुरक्षा सानुग्रह अनुदान योजनेंतर्गत लाभ देण्यात येतो. यात अपघाताच्या बाबीमध्ये आर्थिक सहाय्यात अपघाती मृत्यू झाल्यास दोन लाख रूपये, अपघातामुळे दोन डोळे अथवा दोन हात किंवा दोन पाय निकामी झाल्यास दोन लाख रूपये, अपघातामुळे एक डोळा व एक हात किंवा एक



पाय निकामी झाल्यास दोन लाख रूपये, अपघातामुळे एक डोळा अथवा एक हात किंवा एक पाय निकामी झाल्यास एक लाख रूपये अनुदान देण्यात येते.

**अपघातांचा समावेश असणाऱ्या बाबी :** अपघातामध्ये रस्ता, रेल्वे अपघात, पाण्यात बुडून मृत्यू, जंतूनाशके हाताळताना अथवा अन्य कारणामुळे विषबाधा, विजेचा धक्का बसल्यामुळे झालेला अपघात, वीज पडून मृत्यू, खून, उंचावरुन पडून झालेला अपघात, सर्पदंश व विंचूदंश, नक्षलवाद्याकडून झालेल्या हत्या, जनावरांचा हल्ला, चावण्यामुळे जखमी किंवा मृत्यू, बाळंतपणातील मृत्यू, दंगल, अन्य कोणताही अपघात, या अपघाताच्या बाबींचा समावेश आहे.

**अपघातांचा समावेश नसणाऱ्या बाबी:** अपघातामध्ये नैसर्गिक मृत्यू, विमा कालावधीपुर्वीचे अपंगत्व, आत्महत्येचा प्रयत्न, आत्महत्या किंवा जाणीवपूर्वक स्वतःला जखमी करुन घेणे, गुन्ह्याच्या उद्देशाने कायद्याचे उल्लंघन करताना झालेला अपघात, अंमली पदार्थाच्या अंमलाखाली असताना झालेला अपघात, भ्रमीष्टपणा, शरीरांतर्गत रक्तस्त्राव, मोटार शर्यतीतील अपघात, युद्ध, सैन्यातील नोकरी, जवळच्या लाभधारकाकडून खून याबाबींचा समावेश राहणार नाही.

**आवश्यक कागदपत्रे :** या योजनेंतर्गत लाभ प्राप्त होण्यासाठी अर्जासोबत सातबारा उतारा, मृत्यूचा दाखला, शेतकऱ्यांचे वारस म्हणून गावकामगार तलाठ्याकडील गाव नमुना नं. सहा क नुसार मंजूर झालेली वारसाची नोंद, वारसदाराचे ओळखपत्र, आधार कार्ड, पॅन कार्ड, बँक पासबुक, निवडणूक ओळखपत्र, अपघातग्रस्ताचा वयाचा दाखला ज्यात जन्म दाखला, शाळा सोडल्याचा दाखला, शाळेच्या मुख्याध्यापकाचे प्रमाणपत्र, ग्रामपंचायतीचे प्रमाणपत्र, आधार कार्ड, पॅन कार्ड, वाहन चालविण्याचा परवाना, पारपत्र, निवडणूक ओळखपत्र यापैकी कोणतेही एक कागदपत्र, प्रथम माहिती अहवाल, घटनास्थळ पंचनामा, पोलिस पाटील माहिती अहवाल, अपघाताच्या स्वरूपानुसार अंतिम विमा प्रस्तावासोबत सादर करावयाची कागदपत्रे सादर करावी लागणार आहे.

अपघातग्रस्त शेतकरी, शेतकऱ्यांचे वारसदारांनी सर्व निर्धारीत कागदपत्रांसह परिपूर्ण प्रस्ताव संबंधीत तालुका कृषि अधिकारी यांच्याकडे ३० दिवसाच्या आत सादर करावे लागणार आहे. यासाठी कृषि विभागाच्या सर्व क्षेत्रिय अधिकारी, कर्मचारी यांचे मार्गदर्शन करतील. योजनेंतर्गत वारसदाराची निवड अपघातग्रस्ताची पत्नी, अपघातग्रस्त स्त्रिचा पती, अपघातग्रस्ताची अविवाहित मुलगी, अपघातग्रस्ताची आई, अपघातग्रस्ताचा मुलगा, अपघातग्रस्ताचे वडील, अपघातग्रस्ताची सून, अन्य कायदेशीर वारसदार याप्रमाणे करण्यात येणार आहे.

## स्व.बालाजी मेकाले यांच्या पार्थिवावर नरसी येथे अंत्यसंस्कार

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**नायगाव । प्रतिनिधी**

येथील म.रा.वि.वि. कंपणीतील ऑपरेटर व नरसी येथील रहिवासी बालाजी माधवराव मेकाले वय ३८ वर्ष यांचे दि.१२ फेब्रुवारी २०२५ रोजी बुधवारी सायंकाळी ७वाजता हैद्राबाद येथील दवाखान्यात उपचार दरम्यान दुःखद निधन झाले आहे.



स्व. बालाजी मेकाले यांच्या पार्थिवावर दि.१३ रोजी गुरुवारी दुपारी २ वाजता नरसी येथे शोकाकुल वातावरणात अंत्यसंस्कारकरण्यात आले. त्यांच्या पश्चात आई, वडील, पत्नी, दोन मुल, एक भाऊ, भावजई, दोन बहीण, असा मोठा परिवार आहे. ते नरसी येथील सेवानिवृत्त लाईनमन माधवराव मेकाले यांचा मुलगा होत. ते अतीशय मनमिळाऊ स्वभावाचे होते. अंत्यविधीस गावातील नागरिक पाहुणे मित्रमंडळी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## रोटरीच्या शैक्षणिक साहित्य उपक्रमा अंतर्गत शाहू विद्यामंदिरला टीव्ही संच भेट

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**केज । प्रतिनिधी**

रोटरी डिस्ट्रिक्ट ३१३२ अंतर्गत रोटरी क्लब ऑफ सोलापूर यांच्या पुढाकाराने, डिस्ट्रिक्ट गव्हर्नर नॉमिनी जयेश पटेल यांच्या मेसर्स पी पी पटेल अँड कंपनी आणि रोटरी फौंडेशन च्या अर्थसहाने व रोटरी क्लब ऑफ केजच्या उपक्रमांअंतर्गत केज शहरातील राजर्षी शाहू विद्यामंदिर शाळेला टीव्ही संच भेट देण्यात आला.

शैक्षणिक साहित्यांतर्गत विद्यार्थ्यांना आकलन क्षमता वाढावी व शिक्षण अधिक सुलभ होऊन अभ्यासाची गोडी निर्माण करण्याच्या उद्देशाने या टीव्ही संचाची अभ्यासक्रमाची डिझायनिंग करण्यात आली



आहे. डिजिटल क्लासरूम च्या माध्यमातून गरजू शाळांना आपल्या अध्यापनाचा दर्जा उंचावण्यासाठी रोटरी ने हा उपक्रम हाती घेतला आहे. येत्या पाच वर्षात प्रतिवर्षी जिल्ह्यातील शंभर शाळांना अशा डिजिटल रुम तयार करण्यासाठी रोटरी मदत करणार आहे. केज शहरातील राजर्षी शाहू विद्यामंदिर या शाळेत पहिल्या उपक्रमात अंतर्गत हा टीव्हीसंच भेट देऊन त्यामध्ये इयत्ता पहिली ते दहावीचा अभ्यासक्रम इन्स्टॉल करण्यात आला आहे. यावेळी सोलापूर रोटरीचे रो अतुल चव्हाण, रो महेश साळुंके, रो उदय शिंदे , केज रोटरीचे अध्यक्ष प्रकाश कामाजी, सचिव अनंत तरकसबंद, केज रोटरीचे हनुमंत भोसले, प्रवीण देशपांडे, सत्यवान राऊत, संस्थेचे अध्यक्ष ऍड राजेसाहेब देशमुख, सचिव जी बी गदळे, मुख्याध्यापिका सौ चाटे–गदळे, शिक्षक व विद्यार्थी उपस्थित होते.यावेळी या महत्त्वाच्या उपक्रमाला आर्थिक सहाय्य करणाऱ्या मे. पी पी फौंडेशन चे केज रोटरीने विशेष आभार मानले.




हजरत सय्यद खाकीशाह वल्ली रहेमातुलाह ऊर्स निमित्त भव्य रक्तदान शिबिर आयोजित केल्याबद्दल कुंचेली चे हजरत सलीम साब रक्त घेतेवेळी शेख शादुल भाई कुंचेलीकर रक्तदान हेच जीवनदान आहे (लोकनेता न्युज नेटवर्क नरसी)

# अर्थ व सांख्यिकी संचालनालया कडून आरोग्यविषयक सर्वेक्षण

### राष्ट्रीय नमूना पाहणीच्या आरोग्यविषयक सर्वेक्षणाची माहिती गोळा

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**नांदेड । बाजीराव पा.गायकवाड**

नांदेड जिल्हयात अर्थ व सांख्यिकी संचालनालयामार्फत आरोग्यविषयक खर्चासंबंधी योग्य व परिपूर्ण माहिती देण्यासाठी घरोघरी जावून सर्वेक्षण करण्यात येणार आहे. तरी सर्वेक्षणासाठी घरी येणाऱ्या अर्थ व सांख्यिकी संचालनालयाच्या अधिकारी, कर्मचाऱ्यांना सर्व कुटुंबीयांनी पूर्ण सहकार्य करावे, असे आवाहन अर्थ व सांख्यिकी संचालनालयाकडून करण्यात आले आहे.

भारत सरकारच्या अधिपत्याखालील राष्ट्रीय सांख्यिकी कार्यालयाच्या धर्तीवर 'कुटुंबांचा आरोग्यविषयक होणारा खर्च' या विषयावर राष्ट्रीय पातळीवर होणाऱ्या पाहणीत राज्यात अर्थ व सांख्यिकी संचालनालय सहभागी होत आहे. या पाहणीमध्ये जानेवारी २०२५ ते डिसेंबर २०२५ ह्या कालावधीत माहिती गोळा करण्यात येणार आहे. निवड झालेल्या कुटुंबांकडून मागील ३६५ दिवसांमध्ये कुटुंबाच्या आरोग्यविषयक होणाऱ्या खर्चाबाबत विस्तृत माहिती गोळा करण्यात येत आहे. उपरोक्त पाहणीचे निष्कर्ष आरोग्य सेवा क्षेत्रात सुधारणा तसेच केंद्र व राज्य शासनाला नियोजनासाठी व धोरणे राबविण्यासाठी उपयुक्त ठरणार आहे.सदर पाहणी राज्यातील सर्व जिल्ह्यांमध्ये होणार



असून या सर्वेक्षणाचा मुख्य उद्देश म्हणजे शासकीय आणि खाजगी रुग्णालय / दवाखान्यातून मिळणाऱ्या उपचारांवर होणारा खर्च, कुटुंबांचा आरोग्यविषयक होणारा खर्च, सर्व वयोगटातील लसीकरण, गर्भवती महिलांना मिळणाऱ्या सुविधांचा तपशील इत्यादी बाबींची माहिती गोळा करणे हा आहे. या सर्वेक्षणाअंतर्गत कुटुंबांची निवड 'एक वर्ष किंवा एक वर्षापेक्षा कमी वयाचे मूल असणारे कुटुंब आणि 'मागील ३६५ दिवसांमध्ये रुग्णालयामध्ये दाखल असणारी कुटुंबातील व्यक्ती यामधून करण्यात येणार आहे. या सर्वेक्षणाच्या निष्कर्षाचा उपयोग आरोग्य सेवा क्षेत्रात सुधारणा आणि सरकारच्या धोरणात्मक निर्णयांची अंमलबजावणी करण्यासाठी होतो. राष्ट्रीय तसेच राज्य पातळीवर प्रभावी निर्णय घेणे शक्य व्हावे यासाठी सर्वेक्षणाच्या माहितीची सत्यता व गुणवत्ता अत्यंत महत्वाची आहे. तरी सर्व संबंधित कुटूंबियांनी, नागरिकांनी या सर्वेक्षणाला परिपूर्ण माहिती देवून सहकार्य करावे असेही आवाहन करण्यात आले आहे.

## लोह्यात १६ फेब्रुवारी रोजी राष्ट्रसंत सेवालाल महाराज जयंतीचे आयोजन

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**लोहा । विशाल घंटे**

लोहा शहरात दरवर्षीप्रमाणे यंदाही बंजारा समाजाचे आराध्य दैवत राष्ट्रसंत सेवालाल महाराज यांच्या जयंतीचे आयोजन दि. १६ फेब्रुवारी २०२५ रोजी आयोजन करण्यात आले आहे.

दि. १६ फेब्रुवारी २०२५ रोजी राष्ट्रसंत सेवालाल महाराज यांच्या जयंती निमित्त विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे.

यात सकाळी १० वाजता भव्य मोटारसायकल रॅलीचे आयोजन करण्यात आले असुन सदरील मोटारसायकल रॅली सकाळी १० वाजता श्री शनिदेव मंदिर ते पारडी तांडा येथील जगदंबा मंदिर पर्यंत निघणार आहे. त्यानंतर सकाळी सकाळी ११.३० वाजता राष्ट्रसंत सेवालाल महाराज यांच्या तेलचित्राची भव्य मिरवणूक श्री शनिदेव मंदिरापासून मुख्य रस्त्याने निघुन राधाई



मंगल कार्यालया येथे विसर्जित करण्यात येऊन यानंतर राष्ट्रसंत सेवालाल महाराज यांच्या जीवनावर भाषणाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला असून यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून मुखेडचे आमदार डॉ. तुषार भाऊ राठोड, शिवराम पवार, देविदास भाऊ राठोड आदी मान्यवर उपस्थित राहणार आहेत. तेव्हा सदरील कार्यक्रमाला लोहा तालुक्यातील सर्व नायक,कारभारी यांच्यासहीत सर्व बंजारा समाज बांधवांनी हजारोंच्या संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन राष्ट्रसंत सेवालाल महाराज सार्वजनिक जयंती मंडळाच्या वतीने करण्यात आले आहे.

# राज्यस्तरीय महसूल क्रीडा स्पर्धेची नांदेडमध्ये जय्यत तयारी कसून सराव, मैदानाचे अद्यावतीकरण, व्यवस्थाचे नियोजन

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**नांदेड । बाजीराव पा.गायकवाड**

राज्यस्तरीय महसूल क्रीडा स्पर्धेच्या जय्यत तयारीला नांदेडमध्ये सुरू झाली आहे एकीकडे महसूल विभागातील कर्मचारी आपले काम सांभाळून मैदानी तयारी करत आहे तर दुसरीकडे अडीच हजारावर येणाऱ्या कर्मचाऱ्यांच्या स्वागतासाठी प्रशासन कामाला लागले आहे क्रीडा विभागाने मैदानाच्या अद्यावतीकरण केले असून जिल्हा व महानगरपालिका प्रशासन स्वच्छतेच्या कामाला प्राधान्य देत आहे.नांदेड येथे २१ ते २३ फेब्रुवारी २०२५ रोजी छत्रपती संभाजीनगर विभागाच्यावतीने राज्यस्तरीय महसूल क्रीडा व सांस्कृतिक स्पर्धेचे आयोजन श्री. गुरु गोबिंदसिंघ जी स्टेडियम येथे करण्यात आले आहे. या राज्यस्तरीय स्पर्धेचे उदघाटन राज्याचे महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या हस्ते होणार आहे.

या क्रीडा व सांस्कृतीक स्पर्धांना महसूल विभागाचे अपर मुख्य सचिव, विभागीय आयुक्त, नोंदणी मुद्रांक महानिरीक्षक, जमाबंदी आयुक्त पुणे, सर्व अपर आयुक्त, सर्व जिल्हाधिकारी तसेच छत्रपती संभाजीनगर, कोकण, पुणे, नागपूर, अमरावती, नाशिक या महसूल विभागातील तसेच नोंदणी व मुद्रांक विभाग आणि जमाबंदी आयुक्त, पुणे अशा ७ विभागातील जवळपास दोन ते अडीच हजार पुरुष व महिला खेळाडू उपस्थित राहणार आहेत.यामध्ये संचलन, क्रिकेट, कबड्डी, व्हॉलीबाल, फुटबॉल, खो–खो, रिले, महिला थ्रो–बॉल आणि जलतरण या सांघिक खेळ प्रकाराचा समावेश आहे. तसेच बुद्धीबळ, कॅरम, टेबल टेनिस, बॅडमिंटन, लॉन टेनिस, १००,२००,४००



मीटर धावणे, लांब उडी, उंच उडी, गोळा, भाला, थाळी फेक, रिंग टेनिस आणि ४५ वर्षावरील ३ कि.मी.चालणे इत्यादी वैयक्तिक ८२ प्रकारच्या खेळातील मैदानी सामने श्री गुरुगोविंदसिंघजी स्टेडीयम, इंदिरा गांधी मैदान, पिपल्स कॉलेज, सायन्स कॉलेज या मैदानावर तर जिल्हा क्रीडा संकुल आणि महानगरपालिकेच्या इनडोअर हॉल मध्ये इनडोअर प्रकारचे तसेच कै.शांताराम सगणे या जलतरणिकेमध्ये सर्व जलतरणाचे सामने होणार आहेत. मैदानी खेळाव्यतिरिक्त सर्व ७ विभागाच्या सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन यशवंत कॉलेजच्या मैदानावर सायंकाळी ६ ते १० वा.दरम्यान करण्यात आले आहे. उत्कृष्ट गायन, अभिनय, वैयक्तिक नृत्य, वेशभूषा, नक्कल, वादक, निर्मिती, दिग्दर्शक, कलाप्रकार, निवेदक, नाटीका इत्यादी कला प्रकारचा समावेश आहे.सांस्कृतिक स्पर्धेची जय्यत तयारी जिल्हाधिकारी राहूल कर्डिले यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात येत आहे. अपर जिल्हाधिकारी पी.एस.बोरगांवकर यांचे सनियंत्रणात आणि निवासी उपजिल्हाधिकारी महेश वडदकर, सर्व संघटनांचे पदाधिकारी हे या स्पर्धेच्या तयारीसाठी अहोरात्र परिश्रम घेत आहेत. तसेच नांदेड येथील महसूल अधिकारी, कर्मचारी या स्पर्धेत सहभागी होण्यासाठी सराव करीत आहेत. या सरावासाठी ते मैदानावर सकाळ, संध्याकाळ सराव करीत आहेत.

# इंदापूर मधील राज्यस्तरीय शरद कृषी महोत्सवाला सुरुवात

## शरद कृषी महोत्सवाला इंदापूर मध्ये पहिल्याच दिवशी मोठा प्रतिसाद

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**इंदापूर । बबनराव धायतोंडे**





राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे अध्यक्ष शरद पवार यांच्या वाढदिवसानिमित्त इंदापूर येथे काल गुरुवारपासून शरद कृषी महोत्सवास प्रारंभ झाला. या कृषी महोत्सवाचे उद्घाटन बारामती अग्रो साखर कारखान्याचे व्हाईस चेअरमन सुभाष गुळवे व इंदापूर तालुकाध्यक्ष तेजसिंह पाटील यांच्या हस्तेउदघाटन सोहळा पार पडला तसेच शरद कृषी महोत्सवाचे आयोजक इंदापूर तालुका राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे कार्याध्यक्ष महारुद्र पाटील यांच्या प्रमुख उपस्थितीत पार पडला.

रविवार (दि.१६) रोजी खासदार सुप्रिया सुळे आणि खासदार अमोल कोल्हे यांच्या उपस्थितीत महिला व मुलींसाठी खेळ पैठणीचा कार्यक्रम, शरदचंद्र पवार मंच आयोजित चित्रकला व निबंध स्पर्धा पारितोषिक वितरण समारंभ आणि सोमवार (दि. १७) रोजी सांस्कृतिक कार्यक्रम व प्रदर्शन समारोप समारंभ होणार आहे. या पाच दिवसीय प्रदर्शनात कृषी प्रदर्शनासह शेतकऱ्यांसाठी शेतीतील 'एआय' या आधुनिक तंत्रज्ञानावर चर्चासत्र,सह विविध कार्यक्रमाचे आयोजन केले आहे. इंदापूर येथील प्रशासकीय भवन शेजारी असलेल्या भंव्य प्रांगणात आयोजित या कृषी महोत्सवाच्या माध्यमातून शेतकऱ्यांना शेतीतील उत्पादन व उत्पन्न वाढीसाठीची माहिती उपलब्ध होणार आहे. महोत्सवामध्ये दुसऱ्या दिवशी विद्या प्रतिष्ठानचे खजिनदार युगेंद्र पवार यांच्या उपस्थित सांस्कृतिक कार्यक्रम तिसऱ्या दिवशी शनिवारी कृषी तंत्रज्ञानावर आधारित चर्चासत्रास माजी मंत्री हर्षवर्धन पाटील व बारामतीअँग्रोचे चेअरमन राजेंद्र पवार यांच्या उपस्थितीत आयोजन केले आहे.कृषी महोत्सव यशस्वीरीत्या पार पाडण्यासाठी इंदापूर तालुका राष्ट्रबादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे कार्याध्यक्ष महारूद्र पाटीलतालुकाध्यक्ष अँड. तेजसिंह पाटील,महाराष्ट्र प्रदेशचे कार्यकारिणी सदस्य अमोल भिसे,महिला तालुकाध्यक्षा छायाताई पडसळकर, किसनराव जावळे,सागर मिसाळ,अँड. इनायत काझी,रेश्मा शेख,संजय शिंदे, सम्मद सय्यद,श्रीकांत मखरे,विकास खिलारे,दत्ता चाचार,मयूर शिंदे,गणेश देवकर प्रयत्न करीत आहेत.

# प्रत्येक विद्यार्थ्यांनी जीवनात यशस्वी होण्यासाठी आपल्या बुद्धिमत्तेनुसार यशाचा मार्ग निवडावा

## दीप भारती विद्यालय माहोरा येथे दहावीच्या विद्यार्थ्यांना निरोप



■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**भोकरदन । राम शिंदे**

दीपभारती माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय माहोरा या शाळेमध्ये दहावीच्या विद्यार्थ्यांना यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून श्री गवले व गौरकर हे होते यावेळी भाऊसाहेब गाढे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले अध्यक्षस्थानी शाळेचे मुख्याध्यापक एस के पांडे यांनी विद्यार्थ्यांना आपले ध्येय निश्चित करण्यासाठी आपण वेळीच अभ्यास करून जास्तीत जास्त गुण मिळाले व पुढील कार्यास शुभेच्छा दिल्या यावेळी लोढे सर गोरणे सर सोन्ने सर शिंगाडे सर लहाने सर पैठने सर दाभाडे गोलटगावकर मैडम शेजुळं सर शेजूळ सर भिंगरे मामा पगारे मामा विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते

# पंकज देशमुख व अनिकेत पा.राजूरकर यांचा उपमुख्यमंत्री मा.अजित पवार आणि आ.चिखलीकर यांच्या उपस्थितीत राष्ट्रवादीत पक्ष प्रवेश

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**देगलूर । धनाजी जोशी**



लोहा कंधार विधानसभा मतदारसंघाचे आ.प्रतापराव पाटील चिखलीकर यांच्या नेतृत्वात आणि राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे राष्ट्रीय अध्यक्ष तथा राज्याचे उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांच्या उपस्थितीत देगलूर तालुक्यातील कृषी उत्पन्न बाजार समितीचे उपसभापती पंकज देशमुख, कृषी उत्पन्न बाजार समितीचे माजी सभापती अनिकेत पाटील राजूरकर यांच्यासह अनेकांनी मुंबई येथे राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीत प्रवेश केला. यावेळी आ. विक्रम काळे यांच्यासह अनेकांची उपस्थिती होती. कंधार - लोहा विधानसभेचे आमदार तथा राष्ट्रवादीचे नेते प्रतापराव पाटील चिखलीकर यांच्या नेतृत्वाखाली नांदेड जिल्ह्यात राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी अधिक मजबूत आणि सक्षम करण्याचे मोठ्या नेटाने सुरू आहे. आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीच्या अनुषंगाने पक्षाच्या संघटनात्मक बांधणीसाठी आ. चिखलीकर यांच्या मार्गदर्शनात जिल्ह्यातील अनेक भागातील विविध पक्षातील राजकीय पुढारी , नेते आणि कार्यकर्ते राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये दाखल होत आहेत. त्यातच देगलूर विधानसभा मतदारसंघातील देगलूर कृषी उत्पन्न बाजार समितीचे उपसभापती पंकज देशमुख, देगलूर कृषी उत्पन्न बाजार समितीचे माजी सभापती अनिकेत पाटील राजूरकर, देगलूर कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक बाबुराव आखेमोड, देगलूर कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक सायलू कोंडेवाड, माजी आमदार कै.गोविंदराव पाटील झरीकर यांचे पुतणे संजय पाटील झरीकर, माजी आमदार कै.गोविंदराव पाटील झरीकर यांचे नातू नांदेड दिशा नियोजन समितीचे सदस्य तथा झरी ग्रामपंचायतचे सरपंच धीरज रणजीतराव पाटील झरीकर, दिगंबर सावकार कौरवार, युवा कार्यकर्ते राहुल विजयराव पेंडकर, योगेश रामदास राऊलवार, किरण सूर्यकांतराव उल्लेवार, योगेश मष्णाजी मैलगिरे, बालाजी राजू नामावार, नागेश अनमुलवार, शुभम तुळशीराम मारकवाड, अनिकेत मोगलाजी अनमुलवार, बालाजी मोगलाजी अनमुलवार यांच्यासह अनेकांनी महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांच्या उपस्थितीत मुंबई येथील राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीच्या कार्यालयात पक्षप्रवेश केला. यावेळी उपमुख्यमंत्री अजितदादा पवार आणि आ.प्रतापराव पाटील चिखलीकर, आ.विक्रम काळे यांनी राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये प्रवेश केलेल्या नवीन पदाधिकाऱ्यांनी कार्यकर्त्यांना आगामी कार्यासाठी शुभेच्छा दिल्या.

# गेवराईत दिव्यांग मुला-मुलींच्या जिल्हा स्तरीय क्रीडा स्पर्धासह सांस्कृतिक महोत्सव

## विविध मान्यवरांच्या उपस्थितीत होणार आज स्पर्धेचा भव्य शुभारंभ

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**गेवराई । ज्ञानेश्वर उदावंत**

जिल्हा समाज कल्याण अधिकारी कार्यालय, जिल्हा परिषद बीड व ज्ञानेश जनकल्याण सेवाभावी संस्था, बीड यांच्या संयुक्त विद्यमाने तालुका क्रीडा संकुल, नगरपरिषद क्रीडागण गेवराई येथे जिल्हास्तरीय क्रीडा स्पर्धा व सांस्कृतिक महोत्सवाचे शनिवार दि.१५ ते दि.१६ फेब्रुवारी या दरम्यान आयोजन करण्यात आले आहे. तरी जिल्ह्यातील सर्व दिव्यांग शाळेतील विद्यार्थ्यांनी स्पर्धेत सहभाग नोंदवून स्पर्धेला उपस्थित रहावे असे आवाहन जिल्हा समाज कल्याण अधिकारी कार्यालय व ज्ञानेश जनकल्याण सेवाभावी संस्था, बीड यांच्या वतीने करण्यात आले आहे.

बीड जिल्ह्यातील दिव्यांग शाळेतील मुला-मुलींच्या जिल्हास्तरीय क्रीडा स्पर्धा व सांस्कृतिक महोत्सवाचे प्रतीवर्षी आयोजन करण्यात येते. दरम्यान यावर्षीही जिल्हा समाज कल्याण अधिकारी कार्यालय, बीड व ज्ञानेश जनकल्याण सेवाभावी संस्था, बीड यांच्या संयुक्त विद्यमाने गेवराई येथे आयोजन करण्यात आले असून सदर जिल्हास्तरीय क्रीडा स्पर्धा व सांस्कृतिक महोत्सवाचे शनिवार दि.१५ फेब्रुवारी रोजी सकाळी ९ वा उद्घाटन होणार आहे. या उद्घाटन समारंभास मा.ना.अजित (दादा) पवार (मा उपमुख्यमंत्री, म.रा तथा पालकमंत्री, बीड), प्रमुख अतिथी म्हणून



मा.ना.धनंजय मुंडे (मंत्री, अन्न व नागरी पुरवठा, म.रा), मा.ना.पंकजाताई मुंडे (मंत्री, पर्यावरण व पशुसंवर्धन,म.रा.) तर विशेष अतिथी म्हणून मा.बजरंग सोनवणे (लोकसभा सदस्य) , मा.रजनीताई पाटील (राज्यसभा सदस्या), कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून अविनाश पाठक (जिल्हाधिकारी बीड), प्रमुख उपस्थिती म्हणून मा.विक्रम काळे (विधान परिषद सदस्य) मा.सतिष चव्हाण (विधान परिषद सदस्य,म.रा) , मा.प्रकाश सोळंके (विधानसभा सदस्य, माजलगांव),मा.आ.सुरेश धस ( विधानसभा सदस्य आष्टी) मा.आ.नमिता मुंदडा (विधानसभा सदस्य, केज), मा.आ.संदिप क्षीरसागर (विधानसभा सदस्य, बीड), मा.आ.विजयसिंह पंडीत (विधानसभा सदस्य, गेवराई), हे उपस्थित राहणार आहेत. तर दि.१६ फेब्रुवारी २०२५ रोजी दुपारी ४ वाजता भव्य क्रीडा स्पर्धेच्या बक्षीस वितरण समारंभ होणार आहे.यावेळी कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी गेवराईचे तहसीलदार संदिप खोमणे , उपविभागीय पोलीस अधिक्षक नीरज राजगुरु, विशेष उपस्थिती म्हणून गेवराई नगरपालिकेचे मुख्याधिकारी विक्रम मांडुरके , गेवराई पंचायत समितीच्या गटविकास अधिकारी श्रीमती कांबळे एम.एस, गेवराईचे गटशिक्षणाधिकारी शिंदे डि.आर हे उपस्थित राहणार आहेत. तरी जिल्हास्तरीय दिव्यांग मुला-मुलींच्या क्रीडा स्पर्धेस व सांस्कृतिक महोत्सवास उपस्थित रहावे असे आवाहन बीड जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी आदित्य जीवने , ज्ञानेश जनकल्याण सेवाभावी संस्थेचे सचिव राजेश गोतावळे , जिल्हा समाज कल्याण अधिकारी श्रावस्ती मेश्राम, अति. मुख्य कार्यकारी अधिकारी वासुदेव सोळंके यांनी केले आहे.

# मातृतीर्थ सिंदखेड राजा तालुक्यातील अवैध वाळू वाहतूक प्रकरणी शिवसेनेचे नेते म्हसाजी वाघ आक्रमक

## थेट उपविभागिय अधिकाऱ्यांकडे तक्रार दाखल

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**सिंदखेड राजा । प्रतिनिधी**

सिंदखेड राजा येथील खडकपूर्णा नदी आणि इतर नद्यांमधून अवैध वाळू वाहतूक सर्रास पणाने होत असल्याच्या बातम्या आणि तक्रारी नियमित समोर येत आहेत. यावर शासनाने कडक कायदे करून काहीच उपयोग होताना दिसत नाही. संपूर्ण सिंदखेड राजा मतदार संघात अवैध रेती वाहतूक बंद असताना नवीन घरे बांधकामाला रेती कोठून उपलब्ध होते हा मोठा प्रश्न निर्माण होतो! या संदर्भात अनेक तक्रारी आणि निवेदन हे संबंधीत कार्यालयात सामजिक कार्यकर्ते राजकीय क्षेत्रातील कार्यकर्ते आणि पदाधिकारी तसेच वाळू उपसा कण्यात येणाऱ्या गावातील नागरिकांकडून देण्यात येतात. यातच म्हसाजी वाघ शिवसेना तालुका संघटक सिंदखेड राजा यांनी उपविभागीय अधिकारी सिंदखेड राजा यांना दिनांक १० फेब्रुवारी रोजी निवेदन दिले आहे. सिंदखेड राजा येथील तहसिलदार आणि दोन कोतवाल यांचे सिडीआर काढून चौकशी करून कार्यवाही करण्यासाठी उपविभागीय अधिकारी सिंदखेड राजा यांना देण्यात आलेल्या निवेदनद्वारे मागणी केली आहे. निवेदनात तहसीलदार यांच्यावर अवैध रेती खनिज वाहतूक प्रकरणी गंभीर आरोप करण्यात आले असून त्यांना दोन कोतवाल हे सहकार्य करत असल्याचे सुद्धा म्हटले आहे. यावरून



तहसीलदार यांच्या सह दोन्ही कोतवालांचे सि.डि.आर काढून त्याची चौकशी करून कार्यवाहीची मागणी ही करण्यात आली आहे.

कोतवालांच्या सेवा वरिष्ठ कार्यालयास संलग्रित न करता संबंधित त्या-त्या सज्ञा कार्यालयास त्वरित वर्ग करण्याचे निर्देश शासनाच्या महसूल व वन विभागाच्या कार्यासन अधिकारी शीतल माने यांनी सर्व विभागीय आयुक्त, जिल्हाधिकारी यांना दिले आहेत. त्यावरच तत्कालीन प्र. जिल्हाधिकारी यांचे दैनिक लोकमत मध्ये दिनांक २५ डिसेंबर २०२४ रोजी प्रसिध्द झालेल्या बातमी मध्ये त्यांच्या नावाने एक कोट देण्यात आला आहे. त्यात त्यांनी कोतवालांच्या सेवा वरिष्ठ कार्यालयास संलग्रित न करता संबंधित त्या-त्या सज्ञा कार्यालयास वर्ग करण्याच्या सूचना प्राप्त झालेल्या आहेत. त्यानुसार उपविभागीय अधिकारी,तहसीलदार यांना कळविले असून, त्यांच्या स्तरावर कार्यवाही केली जाईल.असे म्हटले आहे. परंतु सिंदखेड राजा येथील दोन कोतवाल त्यांच्या साजावर कामासाठी हजार न राहता राजरोसपने सिंदखेड राजा येथिल तहसिल कार्यालयात नियमित हजर राहत होते. या कडे वरिष्ठ अधिकाऱ्यांनी मात्र डोळेझाक केली आहे. तहसिलदार सिंदखेड राजा हे जेव्हा पासून सिंदखेड राजा येथे रुजु झाले आहेत.तेंव्हा पासून ते आज पर्यंत त्यांच्या दोन कोतवालचे कॉल रेकॉर्ड तपासून त्यांची चौकशी करून त्यांच्यावर निलंबनाची कार्यवाही करावी अन्यथा शिवसेना (उबाठा) स्टाईलने उपोषण छेडण्यात येईल असे म्हसाजी नाथा वाघ शिवसेना तालुका संघटक सिंदखेड राजा यांनी उपविभागीय अधिकारी सिंदखेड राजा यांना देण्यात आलेल्या निवेदनात म्हटले आहे.

# आ.राहुल कुल यांनी घेतली मंत्री राधाकृष्ण विखेपाटील यांची भेट

## जलसंपदा विभागाच्या विविध विषयावर झाली चर्चा





लोकनेता न्यूज नेटवर्क

**दौंड | बबनराव धायतोंडे**

दौंड विधानसभा मतदार संघाशी निगडीत जलसंपदा विभागाच्या विविध विषयांबाबत राज्याचे जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्या उपस्थितीत बैठक आयोजित करण्यात आली होती. यावेळी अनेक मुद्द्यांवर चर्चा झाली. जलविद्युत निर्मितीसाठी मुळशी व कोयना प्रकल्पाद्वारे कृष्णा खोऱ्यातील नैसर्गिकरित्या पूर्वमुखी नद्यांचे कृत्रिमपणे पश्चिमेकडील विपुलतेच्या खोऱ्यात वळविलेले पाणी पूर्वेकडे तुटीच्या खोऱ्यात वळविण्याबाबत सुर्वे समितीचा अहवाल सादर करण्यासाठी मुख्यमंत्री मा.देवेंद्र फडणवीस यांच्या समवेत बैठक घेण्यात येईल त्यासाठी आवश्यक अहवाल संबधित विभागाने तयार करावेत असे आदेश मा.मंत्री महोदयांनी दिले तसेच ✻ खडकवासला ते फुरसुंगी बंदनळी कालवा कामासाठी राज्य शासनाकडून २२०० कोटी रुपये निधी मंजूर करण्यात आलेला असून त्याचा कार्यारंभ आदेश देण्यात आलेला आहे.त्यासाठी आवश्यक पर्यावरण आणि वन विषयक मान्यतेचे प्रस्ताव सादर करण्याचे आदेश मंत्री महोदयांनी दिले असून तातडीने काम सुरु करण्याचे आदेश दिले.


✻जुना मुठा उजवा कालवा (बेबी कॅनॉल) अस्तरीकरण व दुरुस्तीसाठी सुमारे १८० कोटी रुपये राज्य शासनाकडून मंजूर करण्यात आलेला असून त्याची सुरु असलेली कामे गतिमान करावीत व शेतकऱ्यांच्या आवर्तनावर परिणाम होणार नाही याची देखील काळजी घावी अशा सूचना केल्या. पुरंदर उपसा सिंचन योजनेच्या मौजे कुपटेवाडी,ता.दौंड,जि.पुणे येथील वितरिकेच्या वरील बाजूस वंचित भागाच्या सिंचनासाठी नवीन पाईप लाईन करणेसाठी सर्वेक्षण करण्यासाठी सुमारे १७.४३ लक्ष निधी उपलब्ध झाला असून, पुढील महिनाभराच्या आत सर्वेक्षण पूर्ण करावे तसेच नव्याने तलाव समाविष्ट करून जास्तीत जास्त वंचित भागाला पाणी देण्यात यावे अशा सूचना केल्या. चिबड,खारवट आणि पाणथळ शेतजमिनी निर्मुलन करण्यासाठी धोरण ठरविणे व दौंड (जि.पुणे) तालुक्यातील सर्वेक्षण पूर्ण करून प्रस्ताव सादर करून त्यास मान्यता मिळण्यासाठी मापदंड मंजुरीसाठी आवश्यक कार्यवाही शासन स्तरावर सुरु असून,वित्त विभागाच्या मान्यतेसाठी सादर करण्यात आला आहे. वित्त विभागाच्या मान्यतेनंतर याबाबत प्रस्तावांना मान्यता देण्यात येईल असे मा. मंत्री यांनी सांगितले. दौंड तालुक्यातील उजनी धरणाच्या बँक वॉटर क्षेत्रात नविन बॅरेजेस बांधणेसाठी सुधारित धोरण ठरविण्याची मागणी केली – त्यासाठी समितीची स्थापना करण्यात आली असून,यामुळे दौंड,शिरूर,श्रीगोंदा,कर्जत,करमाळा परिसरातील शेतकऱ्यांना देखील याचा फायदा होणार असल्याने तातडीने कार्यवाही करावी असे आदेश मा.मंत्री महोदयांनी दिले. मुळा मुठा व भीमा नदीवर अस्तित्वात असलेल्या कोल्हापूर पद्धतीच्या बंधाऱ्यांचे बॅरेजेस मध्ये रूपांतर करण्यासाठी आवश्यक कार्यवाही करण्याबाबत हे सर्व बंधारे अतिशय जीर्ण झालेले असून सर्वच बंधारे बॅरेजेस मध्ये रूपांतर करण्यासाठी धोरणात्मक निर्णय घेऊन त्यांना मान्यता देण्यात यावी असे आदेश मा.मंत्री महोदयांनी दिले. पुणे महानगर पालिकेची पाणी वितरण व्यवस्था सुधारणे व त्यामुळे पाण्याचा होणारा अपव्यय कमी करणे,वापरलेले पाणी प्रक्रिया करून पूर्ण क्षमतेने शेतीला देणे पाणी वापर नियंत्रित करणे आदी गोष्टीसाठीपुणे महानगरपालिकेच्या अधिकाऱ्यांच्या समवेत बैठक घेण्याच्या सूचना अधिकाऱ्यांना दिल्या. जनाई शिरसाई उपसा सिंचन योजनेच्या कालव्यांना बंदिस्त नलिका वितरण प्रणालीमध्ये रुपांतरण करणे व अस्तरीकरण करणे या कामासाठी सुमारे ४३८.४८ कोटी रुपयांच्या कामाला राज्य मंत्रिमंडळाकडून प्रशासकीय मान्यता. जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील साहेब यांचे आभार मानले. यावेळी अपर मुख्य सचिव श्री.दीपक कपूर,कार्यकारी संचालक अतुल कोपोले,प्रकल्प समन्वयक श्री.संजय बेलसरे,मुख्य अभियंता श्री.हनुमंत गुनाले,श्री.हनुमंत धुमाळ यांच्यासह जलसंपदा विभागाचे सर्व अधिकारी उपस्थित होते.

# जिल्हास्तरीय फुटबॉल युथ लिग स्पर्धा २८ फेब्रुवारीपर्यंत नोंदणी करण्याचे आवाहन

लोकनेता न्यूज नेटवर्क

**बुलढाणा | ज्ञानेश्वर बुधवत**

फुटबॉल खेळाची शालेय विद्यार्थ्यांमध्ये आवड निर्माण होण्यासाठी प्रथमच जिल्हास्तरीय युथ फुटबॉल लिग स्पर्धेचे आयोजन जिल्हा क्रीडा संकुल येथे करण्यात आले आहे. या स्पर्धेत सहभागी होण्यासाठी जिल्ह्यातील शाळा व फुटबॉल क्लबमधील १६ वर्ष वयोगटातील खेळाडूंनी २८ फेब्रुवारीपर्यंत नोंदणी करावी, असे आवाहन जिल्हा क्रीडा अधिकारी बी.एस.महानकर यांनी केले आहे.



फुटबॉल या खेळाचा प्रचार व प्रसार समाजातील प्रत्येक खेळाडूंपर्यंत व्हावा यासाठी जिल्हा क्रीडा कार्यालय व जिल्हा फुटबॉल संघटना बुलढाणा यांच्या संयुक्त विद्यमाने जिल्हास्तरीय युथ फुटबॉल लिग सन २०२४-२५ स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. जिल्हातील सर्व शाळेतील १६ वर्ष वयोगटातील खेळाडुंना स्पर्धेमध्ये सहभागी होण्यासाठी जिल्ह्यातील विविध शाळेतील संघाची नोंदणी जिल्हा क्रीडा कार्यालय बुलढाणा येथे ऑफलाईन विनामूल्य नोंदणी करून संघाची यादी दि. २८ फेब्रुवारी २०२५ पर्यंत कार्यालयात जमा करून प्रवेश निश्चित करावा. सदर स्पर्धेसाठी खेळाडुंची वयोमर्यादा १ जानेवारी २००९ नंतरचा जन्म झालेला खेळाडु स्पर्धेकरीता पात्र राहील. स्पर्धेची तारीख नंतर कळविण्यात येईल.फुटबॉल युथ लिग स्पर्धेसंदर्भातील अधिक माहितीसाठी जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय येथे किंवा एन.आर.वानखडे (९९६०४३४४८७), डॉ. जे. डब्ल्यु मोहोड(९४०५७३४४०३), मुकेश बाफणा (९४२२८८११०५), एस.एस.केळे(९४२३४४६५१६) यांच्याशी संपर्क साधावा, अशी माहिती जिल्हा क्रीडा कार्यालयाव्दारे कळविण्यात आली आहे.

# सारिकाताई भुजबळ यांची सावता सेना महाराष्ट्र युवती प्रदेशाध्यक्षपदी निवड

लोकनेता न्यूज नेटवर्क

**दौंड | बबनराव धायतोंडे**

अल्पावधीतच महिला नेत्या अशी ओळख निर्माण झालेल्या सारिकाताई भुजबळ यांची सावता सेना महाराष्ट्र युवती प्रदेशाध्यक्षपदी निवड करण्यात आली आहे. त्यांनी त्यांच्या सामाजिक कार्याला तीन वर्षांपूर्वी भिडे वाडा येथे आत्मदहन आंदोलनापासून सुरुवात करुन त्यांनी कमी कालावधीत तालुका व जिल्ह्यात आपली वेगळीच राजकीय छाप निर्माण करण्यात त्या यशस्वी झाल्या आहेत.




कधी शेतकऱ्यांच्या बांधावरील वाद मिटवण्यात यश तर कधी माघारी आलेल्या मुलींची सन्मानपूर्वक पाठवणी तर कधी शेतकऱ्यांसाठी(ट्रान्सफर) डी.पी. मिळावी यासाठी उपोषण तर कधी अनेक गावांना जोडण्यात येणारा रस्ता जाऊजी बुवाची वाडी ते होलेवाडी बोरिऐंदी रस्त्यासाठी उपोषण आंदोलन तर कधी तालुक्यातील तरुणांना रोजगार मिळावा यासाठी रोजगार मिळावे तर कधी बचत गटात मार्फत महिला आर्थिक सक्षमीकरणाची चळवळ वेगाने पुढे नेण्यासाठी आग्रही,अशा जिजाऊ ब्रिगेड दौंड तालुक्याच्या अध्यक्षा सारिकाताई भुजबळ यांची नुकतीच सावता सेना महाराष्ट्र युवती प्रदेशाध्यक्षपदी संस्थापकीय अध्यक्ष मुंजाजी गोरे व शिरूर लोकसभेचे विद्यमान खासदार अमोल कोल्हे यांचे विश्वासू विकास नरके,आणि सावता सेना महिला प्रदेशाध्यक्षा सौ.स्वाती गोरे यांच्या हस्ते नियुक्तीचे पत्रक देऊन त्यांची निवड करण्यात आली आहे. त्यांच्या निवडीमुळे दौंड तालुक्यातील माळी समाजात आनंदाचे वातावरण असून सर्वच स्तरांमधून त्यांचे अभिनंदन होत आहे.

# स्नेहालय संस्थेचा क्रीडा दिन उत्साहात संपन्न

लोकनेता न्यूज नेटवर्क

**वाघोली | संतोष कदम**

दिनांक ९ फेब्रुवारी २०२५ रोजी स्नेहालय पुनर्वसन केंद्र विकलांग मुलांची संस्था आव्हाळवाडी येथे वार्षिक क्रीडा दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. विद्यार्थ्यांचा क्रीडा कौशल्याचे प्रदर्शन घडवणाऱ्या कार्यक्रमाची सुरुवात मार्चपासने झाली. मुख्य अतिथी जेरी वाझ कुपा सॉफ्टवेअर इंडिया प्रा. लि चे ज्येष्ठ व्यवस्थापक यांनी ध्वजारोहण व मशाल प्रज्वलन करून स्पर्धांना प्रारंभ केला.धावण्याची शर्यत , व्हीलचेअर शर्यत , वॉकर शर्यत , यात विद्यार्थ्यांनी उत्कृष्ट खेळ कौशल्य दाखवत स्पर्धांमध्ये उत्साहात सहभाग घेतला. विद्यार्थ्यांनी विविध व्यायाम, पिरामिड, एरोबिक्स, झुंबा, अशा प्रकारच्या कृती व डान्स मुलांनी करून आपल्या सुप्त गुणांना वाव दिला. ह्या सर्व कार्यक्रमाचे आकर्षण ठरले. स्नेहालय संस्थेचे संचालक रेव्ह. फादर सनी जोसेफ यांनी उपस्थितांना मार्गदर्शन करत विद्यार्थ्यांचे गोड कौतुक केले आमच्या शाळेतील हे




विद्यार्थी भविष्यात कोणत्याही क्षेत्रात यशस्वी होतील असा माझा विश्वास आहे असा विश्वास त्यांनी प्रकट केला त्यांनी पालकांना आणि शिक्षकांना प्रोत्साहित केले. स्नेहालय संस्थेची विद्यार्थिनी कु. ज्ञानेश्वरी नितीन सोनवणे हिने ‘स्नेहास्पर्शन’ मासिकाचे सर्व प्रिंटिंग व डिझाईनचे उत्कृष्ट काम केले, त्यावेळेस या मासिकाचे प्रकाशन रेव्ह. फादर रॉक्सी फर्नांडिस यांच्या हस्ते केले गेले. त्याच वेळेस स्नेहालय संस्थेची विद्यार्थिनी कु. प्रतीक्षा ढगे या विद्यार्थिनींच्या स्वरचित कविताचे पुस्तकाचे प्रकाशन करण्यात आले.आव्हाळवाडी गावचे सरपंच माननीय नितीन आप्पासो घोलप यांच्या हस्ते या पुस्तकाचं प्रकाशन करण्यात आले. मुख्य अतिथी जरी वाझ यांनी विद्यार्थ्यांना क्रीडेमधील सहभाग महत्त्वाचा असून परिश्रम व समर्पणाच्या जोरावर यश मिळवता येते, असा संदेश दिला सर्व मुलांचे त्यांनी भरभरून कौतुक केले. या कार्यक्रमाला महाराष्ट्राचे कबड्डी संघाचे प्रतिनिधित्व करणारी कु. वैशाली राजेंद्र जाधव , सर्व पालक ,ब्रदर्स, मरियाशरण चे सिस्टर्स, निर्भिड पत्रकार स्वरूप गिरमकर, पत्रकार संतोष कदम व इतर पाहुणे मंडळी उपस्थित होते. कार्यक्रमाच्या समारोपानंतर विजेत्याना पदके, ट्रॉफी, आणि प्रमाणपत्रे देण्यात आली. कार्यक्रमाचे नियोजन स्नेहालय संस्थेची विशेष शिक्षिका रोमा भोसले, प्रमिला वाघ व शाळेचे मुख्याध्यापक सुबोध बारला, डॉक्टर मॅथ्यू मनीकम यांनी केले. सूत्रसंचालन सिस्टर सुकरीन परेरा व सौ रेखा आल्हाट यांनी केले. स्नेहालय संस्थेचे सर्व शिक्षक वर्ग, दीदी,मावशी मामा, भैय्या यांचा सहभाग होता. राष्ट्रगीताने या कार्यक्रमाची सांगता झाली.

# महामानव डॉ बाबासाहेब आंबेडकर नावाच्या निळ्या आभाळाची सावली म्हणजे आई रमाई–प्रबुद्ध साठे



लोकनेता न्यूज नेटवर्क

**आष्टी | अण्णासाहेब साबळे**

स्री शक्ती ही राष्ट्र शक्ती आहे,याचे उत्तम आदर्श व प्रेरणा आई रमाई आंबेडकर असून जिच्या हाती शिक्षण,कुटुंब,समाजाची दोरी तीच राष्ट्राला उद्धारी,महामानव डॉ बाबासाहेब आंबेडकर नावाच्या निळ्या आभाळाची सावली म्हणजे आई रमाई,महिलांनी आपल्या बाप मुलगा,भाऊ,पतीकडे चळवळीच्या योगदानाचा हिशोब मागावा असे आवाहन चला आपल्या बुध्दाच्या घरी अभियान प्रमुख व प्रजासत्ताक जनता परिषद आणि भारतीय बौद्ध धम्म संस्कार महासंघाचे संस्थापक अध्यक्ष प्रबुद्ध साठे यांनी केले ते रमाई जयंती निमित्त अकोला येथे अशोक वाटीका प्रेरणा भूमी ट्रस्ट व महिला महासंघ यांच्या विद्यमाने आयोजित बहुजनांची आई रमाई महोत्सवात प्रमुख मार्गदर्शक म्हणून बोलत होते, कार्यक्रमाचे अध्यक्ष रत्नदीप अबगड, उद्घाटक डॉ ज्ञा वा गव ई, स्वागताध्यक्ष प्रभाकर कवडे, प्रा सुरेश मोरे,राजू भोजने हे होते तर अरुंधतीताई शिरसाठ,दामोदर जगताप, पि जे वानखडे, प्रमोद देंडवे, आम्रपाली खंडारे,नंदकुमार डोंगरे, वंदनाताई वासनिक,इंदुताई मेश्राम, प्रभाकर शिरसाठ,भाऊसाहेब थोरात, आदी मान्यवर उपस्थित होते कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी पुरुषोत्तम वानखडे,आशुतोष वासनिक, देवानंद पाटील,संजय तायडे,संजय इंगळे, कवी शामस्कर,बबलू वाघमारे,अनिल पंडित,शामराव डोंगरदिवे,आदींनी प्रयत्न केले,प्रास्ताविक संगिताताई रायबोले,यांनी केले तर सूत्रसंचालन पुरुषोत्तम वानखडे,संतोष वानखडे तर आभार देवानंद पाटील यांनी मानले कार्यक्रसाठी प्रचंड बहुसंख्येने स्री –पुरुष तरूण विद्यार्थी वर्ग उपस्थित होता

हे पत्रक,मालक,मुद्रक, प्रकाशक संपादक ज्ञानेश्वर भाऊसाहेब मुंढे यांनी न्यू गीता प्रिंटिंग प्रेस मिरकाळा ता गेवराई जि बीड ४३११२७ येथे छापून दैनिक लोकनेता कार्यालय हो.नं ५०,मेन रोड मिरकाळा ता गेवराई जि बीड ४३११२७ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले आहे. मो.नं ८४५९९७७९०४

This Newspaper is printed by owner, printer, publisher editor Dyaneshwar Bhausaheb Mundhe at New Geeta Printing Press Mirkala Ta Gevrai District Beed 431127 and published at Dainik Lokneta Office Ho.No. 50, Main Road Mirakala Ta Gevarai District Beed 431127 (Maharashtra) Mo no 84599 77904